# आजचा_तरुण

पेटणारा जाळ आहे
आज हया हृदयात माझ्या
धुमसणारा अंगार आता
पेटतो अंगात माझ्या
भरकटलेल्या विचारांचे
मनामध्ये थैमान आहे
तारुण्याच्या रक्ताने थबकणारे
पण, गुरफटलेले विचार आहे
मी तरुण आजचा
क्षमतेने ओथंबलेला
कधी जातीने, कधी धर्माने,
कधी पैशाने, कधी दैवाने,
सर्वस्वी मजबूर आहे
मीच नक्षलवादी होतो,
कधी आतंकवादी होतो,
कधी जातीयवादी, तर
कधी भस्मासूर होतो.
रोज जाळतो स्वतःला,
जगासोबत जळत असतो
सगळं, सगळं मिळेल असं
जग, उगाच शोधत असतो

## आयुष्याची वाट

आयुष्याच्या वाटेवर,
पावलांचे ठसे उमटवत,
मी असाच जात होतो.
मागे वळून पाहिले,
ठसे कुठेच दिसेना.
तितक्यात एक पुरुष
वाटेने चालतांना दिसला.
तो झरझर चालत होता.
त्याच्या प्रत्येक पावलाखाली
ठसा स्पष्ट होत होता.
मी त्यास थांबवले व कारण विचारले
तो म्हणाला,
मला कारण ठावूक नाही
कारण, मी त्याचा विचारच करत नाही.
माझे लक्ष माझ्या ध्येयाकडे.
एवढे सांगून तो झपाटयाने जाऊ लागला.
हलकेच त्याने माझे उत्तर दिले होते.
माझ्या मनातही ध्येय स्पष्ट होत होते.
मागे न बघता पाऊल समोर पडत होते.

## प्रिये तू गेल्यापासून

प्रिये, तू गेल्यापासून
सगळं सगळं उदास आहे.
फुलांनी नेहमीच डवरलेले जग
आज मात्र रंगहीन आहे ... १

पक्ष्यांच्या किलबिलाटाचे
स्वर आज संथ कां ?
ऋतुराजाच्या खजिन्यातले
रंग असे बेरंग कां ? ... २

प्रिये तू गेल्यापासुन
मनात नुसती हुरहूर आहे.
प्राण कंठाशी अन,
वात सुध्दा संथ आहे ... ३

कालपर्यंत उंबरातल्या
आम्रतरुवर कोकीळ होती.
तुझ्या, माझ्या प्रेमाचे गीत
ती धुंद होऊन गात होती ... ४

आज विरहाचे गीत
असे माझ्याच ओठी आहे.
या उदास विश्वामध्ये
तुझाच पसरलेला गंध आहे ... ५

पुन्हा माझ्या जीवनात
पूर्वीचा वसंत यावा.
हया ओठी प्रणयाचे
धुंद, धुंद गीत यावे ... ६

हया रंगीत निसर्गाचा
सुंदर असा मोर व्हावा.
अन् , तुझ्या माझ्या प्रेमाचा
पुन्हा पिसारा फुलावा ... ७

## CHALLENGE

Challenge in life
makes us charming.
Solution of it,
makes world happy.
Without challenge,
world will be finished.
When it disappears
Joy also disappears
& makes us
dull, dull and dull

## तेजोनिधी

हे दिव्य भास्कर तेजोनिधी ,
हे दिव्य भास्कर ग्रहोपती ,
तुजविण दयाळा कोई नही.
तुजविण न रहे ही उत्पत्ती.
तू कारण आहे या सृष्टीचा.
तू व्हावे जगाचा सेनापती.
हे दिव्य भास्कर तेजोनिधी ....1
तू दिव्य, मंगल जगदगुरु.
तुज नमन भास्करा तेजोपती,
तुझ्या किरणबाहूच्या कवेत मी.
सर्व तेजशक्तींचा पूंज तू.
हे भीम दयाळा विश्वास तू.
हया सर्व जगाचा श्वास तू .
हे दिव्य भास्कर तेजोनिधी ....2
श्रेष्ठ तू , अजेय तू
तू नभाची देवता
उत्तुंग तू ,दिव्य तू
तुझीच राहो कामना.
हे दिव्य भास्कर नभपती,
हे विश्व तुझेच , हे दिलेस तू .
तुझीच राहो कृपा दृष्टी, अन
तुझीच राहो प्रेरणा.
हे दिव्य भास्कर तेजोनिधी ....3

## राणी

फुलांच्या ताटव्याने किती फुलावे ?
मोग–याच्या वेलीने किती झुकावे ?
मनातल्या फुलाने किती मोहरावे ?
ते सर्व तू ठरवतेस ......
तू आहेस
म्हणून वसंत आहे.
रानी पसरलेला सुगंध,
पाना पानातून ओसंडतो.
तेव्हा त्याला तुझी चाहूल लागते ......
रान मनमुराद हसते.
तेव्हा ते तुझे गाणे गाते .
राणी तू आहेस
तरच , जीवन गाणे आहे........
तू म्हणजे , माझ्या सारख्या खडकावर
पसरलेली हिरवळ आहे..
इवलेसे फुल प्रेमाचे त्यावर डोलत आहे.
राणी जगात फक्त तू आहेस
बाकी आहेत सगळे फक्त भास .........

# निखारा

विझलेल्या निखा–यातही
धग अजून तरुण आहे.
थोडयाश्या फुंकरेची
मज फक्त वाट आहे //1//

ओलावलेल्या नदीपाशी
तूनेच मज शब्द दिला.
त्या शब्दाने चेतवलेला
तरुण अजून आवेग आहे //2//

बहरलेला डवरलेला ,
केवडा केव्हाच उमलून गेला.
झडलेल्या फुलातही,
सुगंध मी साठवून आहे //3//

आकाशी कडाडलेली
वीज केव्हाच कोसळून गेली.
तापलेल्या जमिनीची
धग हृदयात ठेऊन आहे //4//

माझ्या कवेत कोसळलेला
देह तुझाच तापलेला.
त्या देहाचा गंध, प्रिये
अजुन या देहात आहे //5//

मदिरेने पुर्ण भरलेला
पेला पूर्ण झोकून दिला.
तरी तुझ्या आठवणीची
मनामध्ये चाहूल आहे //6//

## तुझे तारुण्य

चांदण्यात न्हाऊन आपण
धुंद होउनी गाऊच गाणी.
सुमधूर सूरात व्हावी
तू मैफिलीतली राणी  //1//

दव थेंबाचा पडावा,
तुझ्या गालावर शिडकावा.
मोहरुन प्रेमाचा ग प्रिये,
फुलावा वसंत सारा  //2//

त्या सुंदर रात्री प्रिये
वाटे मी पूर्ण हरावे.
जिंकून मला तू पूर्ण
तू ग मोहरुन खुलावे //3//

हिरव्या कंच पालवीत वाटे
तुझे तारुण्य झाकावे.
झोकुनी तुजवर प्रिये,
मी बेहोश व्हावे  //4//

# वासना

कॉल बेल वाजली म्हणून
दार उघडले.
दारात नेहमीचाच दलाल होता.
साहेब, नवीन पिस आहे,
त्यान मागे खुणेने सांगितले.
दुर झाला तेव्हा,
एक फ्रॉक मधली मुलगी
नखशिकांत थरथरत
उभी होती.
वासना केवढी क्रूर असते.
याची जाणीव करुन देत होती.

रुपवती

खुले केस तिचे , उडू लागलेले
मन माझे तयात , बुडू लागलेले //१//
लाल, लाल कळयांचे , नक्षिकाम ओठी
मनाचा तोल , ढळू लागलेले //२//
छातीचा चढाव, उंच उंच जाई
मन तेथेच दरीत , लपून राही //३//
अंगांगी तिच्या , खेळते ही वीज
सर्वांग माझे, ती पेटवून जाई //४//
ओटी पोट तिचे , अति बाकदार
फुलले त्यावर , इवले जाईचे फूल //५//
भरलेल्या मांडीचा , घाट जोमदार
उफाळल्या समुद्राचा , सांभाळेल हा तोल //६//
चालणे हे तिचे , असे डौलदार
मस्तीत राही , हत्तिणीची चाल //७//
हास्यात खुलेल , मोग-याची रांग
गालावर गुलाबी , गुलाल गुलाल //८//
सौदर्य तुझे , ना या जगातिल
अप्सरांना ती भीती , आज ही पडेल //९//

## महाराज श्री टोळशास्त्री यांची महायात्रा

रात्रं-दिन सेवा
अवघ्या जनांची करतो.
दिवा विझता, विझता
जगी प्रकाश फाकतो //१//

पताका भागवताची
अवघ्या देशी मिरवली.
आता झोपली थकून
टोळ महाराजांची काया //२//

वैकुंठाच्या दारावर
उभा पांडुरंग ठाकला.
वाट पाहते संताची
ती विठाई माऊली //३//

आता दिंडीमध्ये , ग्यानबा चालला.
तुका बरोबर , चोखोबा चालला.
मिसळले संत , ही संताची पालखी,
वैकुंठाचे दारी , आता संताची आरती //४//

## गुलाम

पेटणारे स्वप्न माझे
पेटणारे गीत व्हावे.
पेटणा-या विचारांचे
या जगी शिल्प व्हावे //१//

पिढयांचा अन्याय मी
आज आता गिळणार नाही.
निळकंठी विष माझे
या कंठी जाळणार नाही //२//

खूप झाले, अफूने मज
आजवर झोप आली .
चिरे बंदी वाडयातली ती
आज माझी, गुलाम व्हावी //३//

माणूस म्हणून जगावयाचे
इतके माझे विचार होते
आज मात्र वाटते
जगी महामानव व्हावे //४//

ओंजळीतल्या पैशाची
अजूनही घमेंड आहे
थिबकणा-या घामाचे
प्रत्येक दारी, रक्त आहे //५//

शोषणा–या मानवाचे
या जगी थैमान आहे
सिता हरणा–या रावणाचे
प्रत्येक जागी विष आहे //६//

पेटणा-या मानवाचा
मी आज आवाज व्हावे
स्वातंत्रगीत गुलामांनी
लेखणीतून माझ्या गावे //६//

## स्वप्न

स्वप्न चुरगळलेले
कोप-यात पडलेले
हलकेच हातात घ्यावे
अन, श्वासात भरावे //१//

स्वप्न थिजलेले
अन, फसलेले
कधी मनात घ्यावे
अन, हलकेच कुरळावे //२//

स्वप्न जंगलेले
अन, धुराळलेले
जरा झटकावे
अन, हवेत उडवावे //३//

स्वप्न मातीत पडलेले
अन, झडलेले
हळूच मातीत रुजावे
त्यावर कोवळे फूल डुलावे //४//

स्वप्न पडलेले कोप-यात
खाली डब्यासारखे
थोडे झटकावे,
मनाच्या फळीत सजवावे //५//

स्वप्न जीर्ण असावे
एखादया जुनाट चित्रासारखे
त्यातील रंगात
अख्खे जग बुडावावे //६//

## विठ्ठल, विठ्ठल

विठ्ठल, विठ्ठल
अखंड गजर
त्रिभुवनी दाटे हा
गजर, गजर ...१
ना देहाचा आवाज
हा आत्म्याचा आवाज
त्रिभुवनी दाटे हा
कणात, कणात ...२
विठ्ठल, विठ्ठल हा
पंढरीचा राजा
त्रिभुवनी सत्ता याची
हा त्रैलोक्याचा राजा ... ३
निळया, निळया आभाळाचे
निळे, निळे डोळे
ढगाची बुबळे याची
आसवे प्रेमभरे ...४
पालखी चालली याची
पंढरीच्या वाटे
संतांची होई गर्दी
पंढरीच्या वाटे ... ५
साथ ही सर्वत्र
टाळ, मृदंगाची
नाम घ्या तुक्याचे
विठ्ठलाचे पाठी ... ६
सर्वत्र विठ्ठल
विठ्ठल, विठ्ठल
आसमंती भरुन ही
उरला विठ्ठल ...७
तुक्याचा विठ्ठल
नाम्याचा विठ्ठल
रावाचा विठ्ठल
रंकाचा विठ्ठल ... ८
विष ही विठ्ठल
अमृत विठ्ठल
जळी, काष्ठी, पाषाणी
विठ्ठल, विठ्ठल ... ९

# अशा ह्र्या दुपारी

भिजुनी तू, जावू नको,
पावसाचे धारी
उसासे असे देऊ नको
अशा हया दुपारी //१//

आसमंत भरलेले
पूर्ण थिजुनी गेलेले
पडती कण झेलू नको
अशा हया दुपारी //२//

भिजलेल्या काचोळीला
थंडी आहे भरलेली
ताणुनी तिज घेवू नको
अशा हया दुपारी //३//

वीज अंगात तुझ्या
हया कडाडते आहे
ती मजवर फेकू नको
अशा हया दुपारी //४//

वेणी तुझी भिजलेली
नागिण ती बनलेली
डंख असा देऊ नको
अशा हया दुपारी //५//

साडी तुझी कसलेली
नको तेथे फसलेली
मन असे फसवू नको
आज हया दुपारी //६//

पावसाच्या धारेत
प्रेम माझे भरलेले
निथळू ते देवू नको
अशा वेडया दुपारी //७//

## माझे मन

कॉलेजात तूला पाहिले,
क्लासमध्ये न्याहाळले,
लायबरीत मी हारवले ,
ते माझे हृदय ... १

सायकलीवर बसवले ,
दूरवर फिरवले ,
पण, तू ठोकरीने उडवले ,
ते माझे प्रेम ... २

वहीत मी लिहिले ,
कॅंटिग मध्ये गिळले ,
तुझ्या नजरेत पिळले ,
तो माझा विरह ... ३

मित्रांनी समजावले ,
बाबांनी रागावले ,
तेव्हा कुठे शिवले ,
ते माझे मन ... ४

पुन्हा काही पहाले ,
क्लास मध्ये न्याहाळले ,
पुन्हा ते जुळले ,
असे माझे प्रेम ... ५

रोज थोडे झुरतेय ,
संध्याकाळी फुलतेय ,
हाती नाही गावतेय ,
असे माझे मन ... ६

## दिवस

या जमिनीवर वळवळणारे किडे आम्ही
प्रत्येक दिवस जगवत असतो ....
आणि प्रत्येक रात्रीच्या अंधारात
नवीन दिवस उबवत असतो ...
आमच्या आयुष्यात
दिवस म्हणजे, तारिख आहे ...
महिना, कॅलेंडरचे पान
आणि गेलेले वर्ष
कोप-यात धुळ खात पडलेले.
जिर्ण झालेले, कॅलेंडर आहे ...
प्रत्येक दिवस
जुन्या ऐखादया दिवसाची
झेरॉक्स असते
रोज त्याच किना-याची
तिच, तिच साथ असते ...

## तारका मम मनाची

स्वप्नात पाहिले मी
स्वप्नात गुंतलो मी
तू तारका मम मनाची
स्वप्नात चुंबतो मी ...१

स्वप्नातील कळयांचा
निशिगंधी सुगंध येतो
प्रेमाची मम गाथा
स्वप्नात गुंफतो मी ... २

स्वप्नातील प्रियेचे
ते रुप दिव्य आहे
अंगात चांदण्या अन्
मुख चंद्र आहे ... ३

तारका, तुज पाहता मी
स्वप्नात दंग होतो
हया जगातील कष्टा मी
मी विसरुन सगळे जातो ... ४

स्वप्नात पाहिले मी
स्वप्नात गुंतलो मी
प्रेम मम प्रियेचे
शब्दात छंदतो मी ...५

## तुझे गीत

तुझे गीत, हया ओठावर
तुझे गीत, हया डोळयांवर
तुझे गीत गाण्यांसाठी
उतरीन मी, त्या मेघांवर ... १

तुझे गीत, हया हृदयावर
तुझे गीत, हया फुलांवर
गुणगुणन्या ते गीत मी
चढेल मी, त्या किरणांवर ... २

तुझे गीत, हया श्वासांवर
तुझे गीत, हया लाटांवर
कवितेचे शब्द पकडण्या
स्वार होईल, त्या वायुवर ... ३

तुझीच प्रतिमा, हया जिवावर
तुझीच मिठी, हया छातीवर
झिडकरुनी सर्व जगाला
प्रेम करुया, हया प्रेमावर ... ४

गीत गाऊया, मस्तानीचे
गीत गाऊया, हिर – रांझ्याचे
जग होईल वेडे, असे
स्वार होऊया, त्या प्रेमावर ... ५

# वड

शांत हया वर्धेकाठी
शांत आहे वारा
संथ या पाण्याला
न खळखळाट थोडा ... १

तीरावर वड उभा
काठी टेकुन पाण्यात
तारुण्याची वीज गेली
बुडून त्या पाण्यात ... २

करपलेला चेहरा
पाही तो पाण्यात
दुःख वेडे आसवे
गाळी तो खोडात ... ३

गुराख्यांचे पोर
खेळे अंगाख्यांदयावर
फांदीतून निघे
पाखरांचा सूर ... ४

उरावर याच्या फुले
कित्येक संसार
स्वतः राहिला मात्र
जन्मभर विधुर ... ५

थकल्या फांदया याच्या
थकले रे खोड
सर्व जीवन जाहले याचे
चंदन, चंदन ... ६

## तुझ्यासाठी

तुझ्या कवेत शिरतो मी
तुजवर मरतो मी
तुझ्यासाठी जगी आलो
तुज डोळयांनी भुलतो मी ...१

तू परी, तू अप्सरा
माझ्या आकाशी, तूच तारका
तुझ्या शब्दाने खुलतो मी
प्रिये, तुज साठी, जगतो मी ...२

तुझ्यासाठीच विणतो
रेशमी धागे सुखाचे
त्या रेशमात प्रेम तुझे
हलकेच जपतो मी ...३

नाजूक वेलीला तुझ्या
लागले फुल प्रेमाचे
सखे, हलकेच फुल ते
अलगद चुंबतो मी ....४

सर्व जगाचा राजा मी
तुजविण अर्थ नाही
करुन प्रेम तुजवर
अर्थ त्यात भरतो मी ...५

# धरती

हिरव्या रंगी, धरती नटली
फुला फुलांनी, शोभुन सजली
जागो, जागी , झरे पाझरे
लाली त्यावर, रवि किरणांची पडली //१//

हया सुंदर पहाटे, पहाटे
ऊषा लाल रंगी नटली
अष्ठ दिशांच्या अंगावरती
सप्तरंगी उधळण पडली //२//

हया सुंदर पहाटे, पहाटे
कवि पाखरांचे कित्येक गाणे
वा लक्ष, लक्ष पुरोहितांचे
वेद मंत्रोच्च्यारत जाणे //३//

हया सुंदर पहाटे, पहाटे
कुठे छान झ-याचे गाणे
डोंगरकुशितून खळखळत
कडयाकपारीत नाचत जाणे //४//

हया सर्व सर्द निसर्गी
ओला सुवास सर्वत्र येतो
दुर पडत्या पावसाने
निसर्गास येथिल, हुरुप येतो //५//

काळया, काळया मेघा आडून
पाऊस येतो, पाऊस जातो
रवि किरणाच्या, जाळया आडून
धुंद येथला निसर्ग होतो //६//

श्रावणातल्या पहाटे, पहाटे
निसर्गा सम, हिरवे व्हावे
अन्, दव बिंदूच्या शाईने
धरतीवर प्रेम गीत लिहावे //७//

## दर्यावर

पावसाची रिपरिप होती
थेंबाची टिपटिप होती
वाराही सुसाट होता
दर्यावरती मेघ होता
काहूर होते माजले
दशदिश्यांना
रण होते गाजले
विजेचेही तांडव होते
प्रकाशाचे लोळ होते
अस्मानी ताकदीचे
अस्मानी दृष्य होते
दर्यावरती नाव होती
प्रियेची मज आस होती
झोपडीच्या वाटेवरती
वाट पाहे
अशी प्रीत होती
फाटलेले शिड होते
तुफानात चिड होती
पण, प्रियेच्या आसवांची
आज मला साथ होती

## पहाटे, पहाटे

तू अशी बिलगू नको,
पहाटे, पहाटे
चूंबून तू घेऊ नको,
पहाटे, पहाटे .....१

मोग-यांची वेणी
पार कोमेजून गेली
मिसळला सुवास
पहाटे, पहाटे ...२

रात्र ती वेडी होती
वेळ ही थोडी होती
धुंद तू होऊ नको
पहाटे, पहाटे ...३

ऊषा ही गुलाबी
अवनित ती मिळाली
लाजून तू जावू नको
पहाटे, पहाटे ...४

गुलाबाच्या ताटव्यावर
दवबिंदूचे मोती
पिऊनी मज घेवू नको
पहाटे, पहाटे ...५

झंकारल्या विणेवर
आज गीत गाऊ दे
साथ ती सोडू नको
पहाटे, पहाटे ...६

मेघ जसे विसकटलेले
तसे केस गालावर
त्यात मज गुंतवू नको
पहाटे, पहाटे ...७

## व-हाड

साहेब मातले, अन्
नेतेही मातले
हया व-हाडाले पार
हयायनं मातित घातले....१

आठवण येते फक्त
निवडणूकीच्या येळेला
बाकीच्या येळी, मात्र
मुंडी पैशात घातली....२

पानी वाहे आभाळातून
पार समुंद्रा पर्यंत
सांगली, कोंल्हापूरी याहीनं
धरणं घातली....३

व-हाडचा राजा म्या
होती सोन्याची लंका
हनुमाना सारखी याहीनं
त्यास, आगही लावली....४

चंद्रपूरी माझ्या आहे
काळया सोन्याच्या खाणी
पश्चिमेकडे याची
सगळी वीजही चालली....५

घामातून माझ्या इथे
पिकतो कापूस
खादी आंगावर याहीच्या
मले लंगोट घातली....६

गांधी बाबाचा केला याहीनं
इलेक्शनी धंदा
जिंकता फुटे इथं, मात्र
विदेशी बाटली....७

## विज्ञानाची कास

विज्ञानाची कास धरुनी
विज्ञानाचे शंख फुकूया
अंधकारी अज्ञानाला
पुर्णतया दुर करुया...१

अणुशक्तीच्या सामर्ध्याने
अग्निबाण व उपग्रहाने
संगणकाच्या कौशल्याने
सर्व जगावर, राज्य करुया....२

ध्वनीच्याही अती वेगाने
सर्व दिशांना कवेत धरुया
वेगवान अग्निबाणाने
मंगळावरही स्वार होवूया ...३

मंगळ, अमंगळ जिर्ण विचारा
दया जरा धुडकावून मागे
रात्रीचा दिन करुनी
शत्रूंना भयभित करुया ...४

नविन जगाच्या रचनेसाठी
प्रत्येक आपण ब्रम्ह होउनी
ज्ञानाच्या पाया वरती
हया जगास पुन्हा रचुया ...५

# तुज पाहता

तुज पाहता मज वाटे
फुलपाखरु व्हावे
बिलगून फुलास सखे
अमृत घट प्यावे ...१

तुज स्वर ऐकता वाटे
दुर वाजतो पावा
पैजणांच्या सुरात वाटे
मोर नाचतो राना ...२

तुज पाहता मज वाटे
देहभान विसरावे
मोर बनूनी सखी प्रिये
वनी धुंद नाचावे...३

तुज मुख पाहतांना
मी चंद्रासही, त्या विसरेन
कमल नैनात मी
माझे सर्वस्वही मिसळेन...४

ओठावरती प्रिये तूझ्या
गुलाब पाकळी काम
थरथरत्या ओठांनी त्या
पेटवी मम् प्राण ...५

दोन, दोन घटी तुझ्या त्या
स्वर्ग सुखांचा साठा
केसात कुरळया तुझ्या अडकली
मम प्रेमाची गाथा ...६

## इवले इवले फुल

इवले इवले फुल मोग-याचे
इवले इवले झाड
इवल्या इवल्या कळयांवर
फुले गातील सुंदर गान ...१

इवल्या इवल्या पानावर
बारिक नक्षिकाम
धरतीवर घुसळून माथा
निघे नवाकुंराचे पान ... २

इवला इवला गंध मिसळून
निसर्ग फुलविल रान
इवले इवले पक्षी गाती
त्याच्या सुंदरतेचे गान ...३

सहस्त्र पाकळी फुल तयाचे
संगमरवरी काम
मोत्यांच्या दवात न्हावून
विसरती, थरारुन देहभान ... ४

## तू अणि मी

तू आणि मी
स्वप्ना मध्ये भेटत असतो
प्रत्येक रात्री पापणीच्या
झोपाळयावर झुलत असतो ... १

तू आणि मी
अस्पर्श प्रेमी परंतू
या प्रेमाचा अर्थ प्रिये
वास्तव्यात शोधत असतो ... २

तू आणि मी
पाखरांच्या थव्यात उडत असतो
वास्तव्याच्या ओसाड जमिनीवर
झाड हिरवे शोधत असतो ... ३

## नाटक

नाटक हे करायचे असते.
नाही, ते जगायचे असते.
बायको समोर नौकराचे
कधी, कधी प्रेमीचे
आलटून पालटून वेगवेगळे
नाटय हे करायचे असते.
नाही, असे जगायचे असते.....
ऑफिसात कधी साहेबांच्या
गुलामीत राहायचे असते.
कधी आपल्या स्टाफवर
उगीचच रागवायचे असते.
कारण, नाटक हे करायचे असते.
जगतो हे दाखवायचे असते......
कधी ऑफिसला दांडी मारुन
मॅटिनीच्या रांगेत
हात तिचा, हातात धरुन
सुगंधी झुळकीवर उडायचे असते.
कारण, नाटक हे करायचे असते.
जगतो असं दाखवायचे असते......

## तुझ्या श्वासामध्ये

तुझ्या प्रत्येक श्वासामध्ये
नवा एक, अर्थ आहे.
तुझ्या एकेक स्पंदनातही
रोज नवा गंध आहे.....१

तुझ्या सवे असतांना
निसर्गानेही शांत व्हावे
कारण, त्या शांततेतही, प्रिये
रोज नवे काव्य आहे ..... २

तुझ्या चालण्यात प्रिये
एक नवे आव्हान आहे.
तुझ्या पाहण्यात प्रिये
शराबी माहोल आहे ..... ३

माझ्या प्रत्येक स्वप्नात प्रिये
तुच पुन्हा यावे
माझे ओठ अलगद
चुंबून तू घ्यावे .....४

तुला पाहता मज वाटे
मी स्वप्नात आहे
स्वप्निल चांदण्याचे धरतीवर
प्रतिबिंब तूच आहे .... ५

# निसर्ग

दवात भिजली, निसर्गी सजली
हिरवळ दाटे चोहीकडे
फुलात नटली, पाखरात हसली
उधळण आहे चोहीकडे ....१

किरणांना लपेटून अंगावर
थरथरती फुले फांदयावर
त्या फुलाचे गालिचे रेशमी
पसरले आहे, चोहीकडे .... २

थवे निघती फुलपाखरी
पराग मधु वेचण्या
त्यात, गुणगुणने भुंग्याचे
भरले आहे, चोहीकडे .... ३

चुंबन घेता फुलांचे
देहभान विसरती भुंगे
गाणे गाई प्रेमाचे
तेही पसरे चोहिकडे .... ४

हिरव्या कंच निसर्गावर
फिरे थरथरता हात वाऱ्याचा
उठे शहारुन निसर्ग
आनंदी नाचे चोहीकडे ....५

## नार तू देखणी

अगं, अगं नार तू देखणी
सोळा वर्षाची साजणी
तुझ्या नख–यात काय ती बात
नाही जगात असली साथ
जाई उडून पदर साजणी
जरा कसुन ठेव साजणी
अगं, नार तू देखणी
सोळा वर्षाची साजणी....1

पिक आल भरार ज्वानीचं
त्यात बेन हाय बानीचं
त्याला कुंपण लाव रातिचं
तू हजारात देखणी
अग साजणी, अग साजणी....2

जरा जपून कर चालणं
तूझं लटकेच हे हासणं
जिवाचा कर विचार
तू सोळा वर्षाची नारं
तू लाखास करते गारं
अग साजणी, अग साजणी....3

माझं घर आहे नागपूरी
त्यात राहा, बनून तू राणी
नैाकराची फौज राबिविलं
तुझ्या दिमतिला, तुझ्या दिमतिला
तुला दागिन्यानं सजविल
माझ्या मनात तुज बसविल
अग साजणी, अग साजणी.....4

तुझ्या नख–यात मी भुललो
तुझ्या हृदयात मी शिरलो
अन अडकलो, अग फसविल,
आता बनून भाडेकरी
तुझ्या मनात मी राहील
तू इश्काची लावणी
अग साजणी, अग साजणी......5

## फौज गुलामाची

फौज गुलामांची
पोटासाठी राबत आहे
दुकानावर मात्र पाटी
लोकशाहीची लावत आहे ....1

काहीच कुटूंबाचा
हा देश कूरण असून
लोकशाही रखेल, तर
सत्ता येथे दासी आहे .... 2

स्वातंत्रवीर आज देखिल
अंदमानात बंद आहेत
सत्येचे गुलाम अजूनही
दिल्लीत पाय चाटत आहे .... 3

काही तूकडयांसाठी आम्ही
अजूनही गुलाम आहोत
गुलामीतच संतुष्टि
प्रत्येकजण शोधत आहोत .... 4

हया धरतीच्या कुशितून
पुन्हा एक कृष्ण यावा
पराक्रमाचा मंत्र त्याने
लाखो अर्जुनास दयावा .....5

गुलामांनी स्वतंत्र व्हावे
दासीनेही मुक्त व्हावे
हया मोकळया आकाशी
विचाराने ही श्वास घ्यावे ....6

टण्त्कार गांडिवाचा
कुरुक्षेत्री या घुमावा
लोकशाहीचा खरा मंत्र
गुलामांच्या कंठात यावा....7

## तरुण मी

तरुण मी, दिव्य मी
बलशाली जगाची प्रेरणा
तीक्ष्ण मी, तेजस्वी मी
विश्वशक्तीची कामना .....1

विज्ञान मी, जीवन मी
नव जगाची संकल्पना
राष्ट्रात तेज माझ्या मुळे
नव राष्ट्राची आराधना .....2

हे राष्ट्र माझे, मजवरी
करिल सेवा मजपरी
तेज पुंज यज्ञात या
मज आहूतिची कामना .... 3

खणखणनारे खडग् तू
तेजस्वी त्याची धार मी
तुज शक्ती मज मुळे
नवतेजाची आराधना .....4

विश्वास मी, श्वास तू
ज्योत मी, वात तू
तेज मी, तेजस्वी तू
सर्वस्व तू , अन
तूझीच राहो आराधना ....5

हे दिव्य भारती नमन घे
तू आहेस जगाची देवता .....6

# नागपूरी अधिवेशन

चला राया आता
नागपूरी अधिवेशनाला
तिथ हूडर्याचा बेत आपण करु
उदघाटनाची फित आपण सोडू
विकासाच्या बाता पण करु, अन्
आठवडयात आपण जावू घरी
विदर्भाचा राहिल तिथच गडी
चोविस तास वीज पुण्याला,
राया चला आता
नागपूरी अधिवेशनाला.....१

मागास विकास म्हणज कायं
नविन, नविन कॉलेज व शाळं
धरणात साचला गाळं
वीज म्हणे जावू पश्चिमेला
कोळसा खावू फक्त पूर्वेला
रात्रिचा दिन मुंबईचा
बाता फक्त मागास विकासाच्या
चला राया आता
नागपूरी अधिवेशनाला.....२

## राजसा

वा-यात गंध गेला
तुझा मिसळून
अंगात रंग आला
आताच उसळून .... १

हया रंगी चिंब भिजूनी
आपण आज जावे
हया शाम रंगी रात्री
रंगुन आज जावे ....२

रात्रीचा प्रहर बेकिचा
गडी कसलेला व रसलेला
ओठात रस मिसळून
गेल अंग माझ घुसळून .... ३

पहाटेचा उजेडला तारा
राया आता तरी मज सोडा
घर आता जागे होईल
खडबड बडबड होईल .... ४

रात्रीची झोप नाही झाली
ती नजरेत तुझ्या दिसेल
नण्देची नजर खटयाळ
हळूच ती खुणवेल ....५

लाजून पूरती जाईल
राजसा आता तरी सोडा
रात्रीचा हट्ट आता सोडा
राजसा.....६

# सुख

मला भेटलेले सुख
मी उशीत कोंबले
म्हणालो आता
शांत झोप येईल
पण, झोप काही येईना...
सुख जे नरम होतं
ते आता बोचू लागलं
वाटले हे माझ सुख
लोकाना नक्कीच खुपत असेल...
माझ्या मनात विचार आला
काल माझा शेजारी
मोठयाने गात होता
नक्कीच तो सुखी असेल का ?
खिडकीतून डोकावलं
रात्री सगळं शांत होतं
मन त्याच्या सुखानं दुखावलं ...
मला काहीच समजत नाही
मी सुखी की दुःखी, उमजत नाही
मी दिवसभर, सुखाचं नाटक करतो
अन संध्याकाळी तेच सुख नको होतं
मी स्वर्गात असेल पण
बाजूचा स्वर्गात असल्याच दुःख आहे
मी सुखात असतांना
ते हिरावेल याचे दुःख आहे
असे वाटते
प्रत्येक सुखाच्या पोटात
अंतहीन दुःखं आहे

## व-हाडी नार

मी हाय व-हाडी नार
बघता, बघता
होशिल तू गार
मारता मी हो झटका
लागल तूम्हास्नी चटका
म्हणून म्हणते मी.....
माझ्या मागं येऊ नका
लाडी गोडी लाऊ नका
जवळ जवळ येता येता
माझी खोडी करु नका
लाडे, लाडे पाहू नका
मी हाय व्हराडी ठेचा
लागल तुम्हास ठसका
म्हणून म्हणते मी
तुम्हा सांगते मी, राव
आणू नका उगाच आव
झोंबल जिभेला चटका
तेव्हा आठवल तुमच गाव....
रात्रीच्या प्रहराला
माडी माझी चढू नका
माझ्या देखण्या देहाकडे
टकमक बघू नका
माझा भ्रतार थोराड
इलाक्यात त्याचा हाय रुबाब
अन काय सागू तुम्हास
तो नामवंत पैहलवान
आता जाव घरी गुमान ....

# मी हया देशिचाराजा

अरं ढवळया, अरं पवळया
मी हाय हया देशीचा राजा
हया शिवारात माझी सत्ता
ना चालल, दुसरा पत्ता
अरं ढवळया, अरं पवळया
अरं हो हो हो ह हो ....

नशिबाची हाय मज साथ
येतया पीक जोमात
तुडवल धान्याची रास
भरल कोठी गोदाम
अरं ढवळया, अरं पवळया
अरं हो हो हो ह हो ....

तुज घेईल झुल जोमदार
गळयामंधी घुंगराची माळ
तू चालल चाल ऐटदार
चढल शिवारात तुझा मान
अरं ढवळया, अरं पवळया
अरं हो हो हो ह हो ....

रखमा माझी बाईल
तीज दागिन्यात मढविन
मुलबाळास कापडं घेईन
शिकवून मोठ करीन
अरं ढवळया, अरं पवळया
अरं हो हो हो ह हो ....

पाटलाचं कर्ज चुकविल
ताठ मानेन मी जगिल
डोसक्यास फेटा घालिल
नव नविन बंडी शिविल
अरं ढवळया, अरं पवळया
अरं हो हो हो ह हो ....

## माझ मन

माझ मन तुषारा सारखं
इकडे, तिकडे उडत असतं
छोटया छोटया थेंबा आड
ईंद्रधनुष्य शोधत असतं .....1

माझं मन लहान मुलातं
पतंगीसाठी पळत असतं
रंगीबेरंगी धाग्यां मध्ये
मोठपण विसरत असतं ....२

माझ मन फुलावर
दवबिंदू शोधत असतं
चकाकत्या रंगामध्ये
वेगळ काही पहात असतं....३

माझ मन फुलपाखरात
सगळीकडे उडत असतं
जगभरातील फुलामध्ये
मधुघट शोधत असतं....४

# शिवराय

शिवराय जपा, शिवराय गुणा
शिवराय पुजा, शिवराय म्हणा
हे राज्य त्या देवाचे
हे राज्य त्या शक्तीचे
हे राज्य सामर्ध्याचे
हे राज्य त्या वैभवाचे ......१
शिवराय जपा, शिवराय गुणा
शिवराय पुजा, शिवराय म्हणा
हे राज्य पुरुषार्थाचे
हे राज्य त्या तेजाचे
हे राज्य भरत भूचे
हे राज्य त्या राष्ट्राचे......२
शिवराय जपा, शिवराय गुणा
शिवराय पुजा, शिवराय म्हणा
उचलून फेकले दैत्य
देशी स्वातंत्र्य मिळाले
खानांची उडविली दैना
भिमतटी पंख मिळाले .....३
शिवराय जपा, शिवराय गुणा
शिवराय पुजा, शिवराय म्हणा
श्रुंखला तुटल्या देशीच्या
शाहयांची झोप उडाली
वर्षांची संपली दैना
मराठीस वीज मिळाली.....४
शिवराय जपा, शिवराय गुणा
शिवराय पुजा, शिवराय म्हणा
हे राज्य स्वातंत्र्याचे
हे राज्य पराक्रमाचे
हे राज्य मराठयाचे
हे राज्य आहे श्रींचे .....५
शिवराय जपा, शिवराय गुणा
शिवराय पुजा, शिवराय म्हणा

# विंचू

विंचू समोर पळत होता
लोक मागे धावत होते
विंचवास अचानक
गांधी टोपी दिसली
विंचू आत शिरला
आज पावतो लोंक
उभे आहेत चपला घेऊन
विंचू बाहेर येईल
हयाची वाट बघत

## गुलामी

गुलामीत राहीलो आम्ही
गुलामीच शिकविली आम्हा
पाठीच्या कण्यातील वीज
धरतीत कोसळते तेव्हा.....१

जन्माने वेढले आम्हा
जातीत जन्म काढला
दारिद्रय ओढून अंगा
पितरांनी जन्म काढीला .....२

माणुसकीची हाक
ना ऐकली मी कधी
पुराणातील अंधार कथांना
मी पोसतोय या जगी .....३

नव विचारांचा अंग्नी
या जगी पेटलेला
जुन्या जळमटी विचारात
हा जन्म गुंतलेला.....४

कुठे जावयाचे आहे
मज आज ठावे नाही
ओझी पुराण इतिहासाची
मी ओढतोय या जगी.....५

अंतराळी हया पावलाचे
ठसे आहे पडलेले
धरतीवर काटे पण
आम्ही का अंथरलेले ? ......६

## ध्येयासाठी

ध्येयासाठी जगायचे
ध्येयासाठी मरायचे
ध्येयासाठी एक दिवस
बीज होऊन रुजायचे .....

ध्येयासाठी झुरायचे
ध्येयासाठी गिळायचे
ध्येयासाठी एक दिवस
पतंगा सारखे उडायचे......

ध्येयासाठी फुलायचे
ध्येयासाठी जळायचे
ध्येयासाठी एक दिवस
रंगामध्ये मिसळायचे .....

ध्येयासाठी चालायचे
ध्येयासाठी राबायचे
ध्येयासाठी एक दिवस
विजेसारखे कोसळायचे .....

ध्येय येथेच शोधायचे
ध्येय येथेच मिळवायचे
त्याचे हात हाती धरुन
जगी आम्ही जगायचे ......

## श्री गणेशा

नमन तुज गणेशा
विघ्नेश्वरा, रुद्रापूता
हे या जगाच्या रक्षका
संकट मोचना, विद्याधरा.....

मुषकस्वारा, पार्वतेसुता
हे या जगाच्या तारका
हे दिव्य नर्तक देवेश्वरा
हे गणेशा, लंबोदरा........

तु पाव आम्हा हे गणेशा
दे यश वक्रतुंडा
स्थुल शरीरा, वज्रबाहू
चपल चंचल विघ्नहर्ता......

हे रक्षका, हे पार्वते सुता
जीवन दायक शुभफला
सिंदूर वदना, जग रक्षका
विद्याभुषा श्री गणेशा.......

चैतन्येश्वरा ओंकाररुपा
दिव्य मंगल ओम गणेशा....

# मदय

हातातील चषकात
फेसाळ मदय आहे.
प्रिये तुझ्या मुखाचे
प्रतिबिंब त्यात आहे.....

नशा त्या मदयाची
तुझामुळेच आहे
ओठी तुझ्या विरहाचे
विरह गीत आहे.......

झोकून तो पेला
संभाळतो मनाला
शरीराचा तोल जातो
पकडतो सावलीला......

अडखळत्या शब्दाचे
पूर्ण गीत आहे
प्रिया तुझ्या सावलीचे
प्रतिबिंब त्यात आहे ......

रात्रीचा दिन होतो
दिन डुबतो रात्रीत
फेसाळ बुडबुडयांचे
जगणेच व्यर्थ आहे ......

रक्ताळ मदयाचे हया
कित्येक घोट घ्यावे
हया क्रूर जगावर
एकदाच स्वार व्हावे ......

हाती लगाम यावा
माझ्याच जिवनाचा
पण, हाय आज तो
कैफात पूर्ण गळाला........

## पुरुष

पुरुष मी
तरुण मी
अहंकार मी
माझ्याच हाती
घरची आशा.........

रंग मी
बेरंग मी
मीच हया
देशीचा राजा........

पुरुषी अहंकाराचे
मीच प्रतिक आहे
माझ्यामुळेच घराचे
घरपण टिकून आहे .....

बायको माझी
दासी व्हावी
मला फक्त
पुत्रच व्हावा
असे माझे विचार आहे........

पुरुषी अहंकाराचे
हे भेसुर रुप आहे .....

## मन पाखरु पाखरु

मन पाखरु पाखरु
उडे झाडा, झाडावर
कुठे ठेवावा पिंजरा
पडे मनात विचार......

मन झाडापेक्षा मोठं
पार आभाळा टेकलं
त्यावर चढावं कसं
हा विचार मनात .....

मन कणात मावतं
उडे वा-याच्या साथीनं
छोटया, छोटया रुपातून
अख्या जगात फिरत.......

मन कठीन भारी
घन मारुन टुटेना
मन वाहतं पाणी
त्यावर धरण टिकेना......

मन कोंडून राहीना
मन उडून जाईना
ते जगात भरुन
पण, हातात गावना......

मन साखर भात
कधी कारल्याची भाजी
शरीराच्या कुपीमध्ये
जशी ठेवावी कस्तूरी......

जवळ असून मन
ते हातात गावना
जरा ठेवावं मोकळं
तर उडून जाईना......

## मातलेला रुबाब

जिंकलेल्या नशेचा
गुलाल आहे चेह-यावर
पाय मात्र चिखलात
रुतलेले आहेत.......

मातलेला रुबाब
झळकतो वागण्यामध्ये
सामान्याचे हात मात्र
छाटलेले आहेत.......

जग जिंकण्याची जिद्द
अंगामध्ये चमकते
पण, सैनिकांचे कलेवर
पायामध्ये आहे .......

मुखामध्ये उच्चार
सतत सत्याचा
सत्येची नशा
यांच्या अंगात आहे.....

गांधींची आठवण
रोज ते काढतात
सामान्यासाठी मात्र
फक्त लंगोट आहे ......

## प्रिये

तुलाच मी दिले प्रिये
ओठातील हसू
तूझेच मी गिळेन प्रिये
डोळयातील आसू........

माझ्या समर्पणाचे
हे निशिगंधी प्रेम आहे
तुझ्या सावलीची प्रिये
मज ओढ आहे.......

दुर असुनही घर
मनी तूच आहे
घरातिल पाखरांचे
मनी गीत आहे.......

घरटयात त्या ऊब
प्रिये तूझ्या मुळे गं
फुलांच्या पाकळयांना
गंध तुझ्यामुळे गं.......

आपुल्या प्रेमाचे प्रिये
हे संपूर्ण रुप आहे
प्रिये तुझ्यामुळे गं
जीवनास अर्थ आहे......

जगण्याची मजा न्यारी

जगण्याची मजा न्यारी
निसर्गाची किमया न्यारी
आकाशी उडवत गुलाल
निशा रंगात बुडाली..........

हिरव्या मखमलीचे
गालिचे पसरलेले
इवल्या, इवल्या फुलांचे
त्यावर रंग शिंपडलेले.......

त्यात पाय रोऊनी
श्वासात निसर्ग घ्यावा
दवबिंदूंच्या मोत्यांनी
हिरवा निसर्ग न्हावा........

ऋतूंचे चक्र फिरते
आसमानी रंग सरते
सप्तरंगी निसर्ग रमतो
रंगात रंग हा मिळतो.....

वसंत फुलतो फुलांनी
गातो कोकीळ कंठानी
मग उन्हाचा उकाडा
रात्री चांदण्यांचा पसारा.......

पावसाची रिमझिम येते
निसर्गास शिरशिरी येते
भिजलेल्या निसर्गाचे
मखमली गाणे होते........

थंडीत उबेची रंगत
त्यात प्रियेची संगत
धुक्यातुन लाली सुर्याची
आसमंती उधळण रंगाची......

अशी मजा जगण्याची
ही किमया निसर्गाची
बदलतो रोज, अन उमलतो
डोलत्या शेतात डवरतो......

हे गीत निसर्गाचे
हे गीत आनंदाचे
हे गीत त्या देवाचे
हे गीत आनंदघनाचे....

# इश्क

इश्क दर्द है
दवा है
या की खुदा ।

इश्क सुकून है
इत्र है
या की जुनुन ।

इश्क राह है
मंजिल है
या की पनाह ।

इश्क मासुम है
फिक्र है
या की गुनाह ।

इश्क, इश्क है
इसे जैसे देखो
वैसा पायेगा ।

ये आईना है
तेरा चेहरा
नजर आयेगा ।

ये सप्त रंग है ईंद्रधनुके,
इसे आसमॉमे उडा के तो देख ।
कोईभी रंगको जरा
तू छुके तो देख ।

पिंजरा

घबराके छिपा हूँ।
अपनेही पिजरेमे ।
वही झुलता हूँ ।
डर, डरके खुशी मनाता हूँ ।
खबराता हूँ , बहार आने से ।
जामून खाता हूँ ।
मिरची खाता हूँ ।
मीठे गीत भी गाता हूँ ।
फिर भी डर है सीने मे ।
पिंजरेसे बाहर आने का डर ।
पर कभी तो उडना है ।
नया आसमान ढुंढना है ।
पर फिर भी डरता हूँ मै ।
आसमॉ की उँचाईसे ।
दुर कही गुम होने का डर है ।
मेरे अस्तित्व खोने का गम है ।
छिपा रहता हूँ , पिंजरे मे ।
उसको ही धोता हूँ ।
नये कपडे पहनाता हूँ ।
सजाके उसको झुलाता हूँ ।
रोज नये गीत गाता हूँ ।
फिरभी डर है , सीनेमे कही ।
कुछ खोने का गम ।
सन्नाटेमे खुश होके भी ।
अपनेसेही डरता हूँ मै ।